# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक श्रीराम बाबुराव बिरारे, वय ५१ वर्ष, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांनी १,००,०००/- रु लाच स्विकारल्या नंतर ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्रीराम बाबुराव बिरारे, वय ५१ वर्ष, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद<br>रा. प्लॉट नंबर १६, मनिषा कॉलनी, सेशन कोर्टचे पाठीमागे, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. उन्मेष थिटे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १,२५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, त्यापैकी १,००,०००/- रुपयाची लाच स्विकारली. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार हे शासकीय ठेकेदार असून त्यांनी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथील वॉच टॉवरचे ७० टक्के झालेल्या बांधकामाचे प्रलंबीत बील, तसेच महिला कारागृहाचे नवीन बांधकामाचे व मुलाखत रुमचे केलेल्या दुरुस्तीचे कामाचे बील मंजुर करण्याची कारवाई करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | आरोपी लोकसेवक यांचे वर नमुद ठिकाणी राहते घरी. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे शासकीय ठेकेदार असून त्यांनी औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथील वॉच टॉवरचे ७० टक्के झालेल्या बांधकामाचे प्रलंबीत बील, तसेच महिला कारागृहाचे नवीन बांधकामाचे व मुलाखत रुमचे केलेल्या दुरुस्तीचे कामाचे बील मंजुर करण्याची कारवाई करण्यासाठी लोकसेवक बिरारे, उप अभियंता हे लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्रीराम बिरारे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे एकुण १,२५,०००/- रु लाचेची मागणी करून त्यापैकी १,००,०००/- रु आजरोजी व उर्वरीत रक्कम बील निघाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक ३१/०३/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, श्रीराम बाबुराव बिरारे, वय ५१ वर्ष, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन १,००,०००/- रुपये लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक यांचे राहते घरी - वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. उन्मेष थिटे यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, मपोना दराडे, पोशि संतोष जोशी, सुनिल पाटील, विलास चव्हाण, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-1)** sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद.**

Scanned with CamScanner